# कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी; शरद पवार गटाकडून आंदोलन

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानसभेत जंगली रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने काल पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आक्रमक आणि प्रतीकात्मक आंदोलन केले. आंदोलकांनी थेट रस्त्यावरच पत्ते आणि जुगाराचे खेळ मांडून, कोकाटेंनी तात्काळ मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी जोरदार मागणी केली.

यावेळी आंदोलकांनी 'तीन पत्ते', 'जंगली रमी', 'कल्याण मटका' यांसारखे जुगाराचे खेळ आणि प्रतिकात्मक नोटा आणत जोरदार घोषणाबाजी केली. कार्यकर्त्यांनी आपल्या गळ्यात पत्त्यांच्या माळा घातल्या होत्या, हातात पत्ते घेतले होते आणि माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा फोटो असलेले पोस्टर्स झळकावत निषेध नोंदवला. या अनोख्या आंदोलनात महिला कार्यकर्त्याही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कृषीमंत्र्यांवर जोरदार हल्ला चढवला. जगताप म्हणाले, महाराष्ट्रामध्ये सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आणि सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पूर्ण करण्यात सरकार स्पष्टपणे नकार देत आहे. या असंवेदनशीलपणावर कळस म्हणून, राज्याचे कृषिमंत्री लोकशाहीच्या पवित्र सभागृहात, म्हणजेच विधिमंडळात, ऑनलाईन जुगार खेळतानाचे चित्र सबंध महाराष्ट्राने पाहिले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांप्रती इतके निष्काळजी असलेले कृषिमंत्री महाराष्ट्राला नकोच अशी भूमिका त्यांनी मांडली.

महाराष्ट्र सरकार भिकारी आहे, या कोकाटे यांनी केलेल्या विधानाचा निषेध करत, आंदोलकांनी उपरोधिकपणे मागणी केली की, जर माणिकराव कोकाटे यांच्यामध्येच राज्याला १० लाख कोटींच्या कर्जातून बाहेर काढण्याची ताकद असेल, तर देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना तात्काळ मुख्यमंत्री करावे. माणिकरावांच्या मते, मंत्री म्हणून मी जर रमी खेळत असेल, तर तुम्ही तरुणांनी आणि शेतकऱ्यांनीही रमी खेळा, मटका खेळा, पोकर खेळा, असा संदेश त्यांनी दिला असल्याचा आरोप करत, हा संदेश 'चांगला' असल्याने त्यांनाच मुख्यमंत्री करावे अशी खिल्लीही उडवण्यात आली.

प्रशांत जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस साहेबांचा सगळ्यात अवगुणी लाडका मंत्री म्हणून माणिकराव पुढे आलेला आहे. देवेंद्र फडणवीसांनी त्यांची बाजू लावून धरली, याचा अर्थ देवेंद्र फडणवीसांना हा अवगुणी मंत्री आवडतोय. मुख्यमंत्र्यांचे माणिकरावाला पाठीशी घालणे ही त्यांची मलाचारीफ असल्याचेही ते म्हणाला. विशेष म्हणजे, ज्यावेळी राज्यात शेतकरी कर्जमाफीचा विषय पेटत आहे आणि ओल्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती आहे, अशा परिस्थितीत कृषीमंत्री विधानभवनात रमी खेळत असतील, तर यापेक्षा महाराष्ट्राचे दुर्दैव असू शकत नाही असे आंदोलकांनी स्पष्ट केले. त्यांनी माणिकराव कोकाटे यांनी तात्काळ राजीनामा देऊन गावात जाऊन पत्ते खेळावेत आणि त्यातून उदरनिर्वाह करावा, असा सल्लाही दिला.कोकाटे यांनी केलेल्या विधानानाचा संदर्भ देत ओसाड गावची पाटीलकी सोडून शेतकऱ्यांवर उपकार करावेत आणि मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा असा टोलाही जगताप यांनी लगावला.

# एफआरपीचे तुकडे कराल तर याद राखा- शेट्टी

**पुणे (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारने १० जुलै रोजी पाठवलेल्या एका पत्राचा आधार घेऊन साखर कारखाने एफआरपीचे तुकडे करू पाहत असल्याचा आरोप करत, एफआरपीचे तुकडे कराल तर याद राखा शेतकऱ्याशी गाठ आहे, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी बुधवारी साखर आयुक्तांची भेट घेऊन दिला.

राजू शेट्टी म्हणाले, केंद्र सरकारच्या १० जुलैच्या पत्राचा आधार घेऊन साखर कारखाने यंदाच्या रिकव्हरीनुसार एफआरपी देणार असल्याच्या बातम्या काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र, हंगामाच्या समाप्तीपर्यंत कारखान्याची नेमकी रिकव्हरी निश्चित होत नाही. ऊस तुटल्यानंतर १४ दिवसांच्या आत विनाकपात एकरकमी एफआरपी देण्याचे मऊस दर नियंत्रण अध्यादेशाफमध्ये स्पष्ट नमूद असताना, या नव्या भूमिकेमुळे त्या अध्यादेशाचा भंग होत आहे. हा केंद्र सरकारच्या भूमिकेच्या आडून साखर कारखाने शेतकऱ्यांच्या एफआरपीचे तुकडे करण्याचा प्रयत्न करत असल्याचे माझ्या लक्षात आले. हा त्यांचा प्रयत्न गेल्या वर्षी मी उच्च न्यायालयात जाऊन हाणून पाडला होता, असे त्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी, १०.२५ टक्के रिकव्हरीच्या आधारावर पहिला हप्ता द्यायचा आणि हंगाम संपल्यानंतर उर्वरित पैसे द्यायचे, या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. त्या याचिकेमध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार, राज्य साखर संघ, साखर आयुक्त अशा सर्वांना पक्षकार करण्यात आले होते. सुमारे ५० तास हायकोर्टात यावर सविस्तर सुनावणी झाली. सर्व घटकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या एफआरपीचे तुकडे करता येणार नाहीत, त्यांना मागील वर्षाच्या रिकव्हरीच्या आधारावर विनाकपात एकरकमी एफआरपी १५ दिवसांच्या आत दिली पाहिजे, असा स्पष्ट आदेश दिला होता. याच पार्श्वभूमीवर, कालच केंद्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांना आणि साखर आयुक्तांना ईमेलद्वारे पत्र दिले होते, आणि आज समक्ष भेटून पत्र दिले की, हायकोर्टाने दिलेल्या निकालाच्या विरोधात जर तुम्ही असे काही करू लागलात, तर तुम्ही कोर्टाचा अवमान करत आहात असे समजून तुमच्या विरोधात अवमान याचिका दाखल केल्याशिवाय मी सोडणार नाही. असा इशारा दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारचे हे पत्र ठरवून आणलेले आणि फसवणुकीसाठी असल्याचा आरोपही त्यांनी केला. कारण केंद्र सरकार केवळ एका राज्यासाठी असे काही सांगू शकत नाही. दिल्लीतील संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी हे पत्र केवळ मसूचना वजाफ आहे, मशासन निर्णय नव्हेफ, असे स्पष्ट केल्याचे त्यांनी सांगितले. मग याचा अर्थ काय? कुणाला फसवणूक करताय? कुणाची करताय? असा सवाल त्यांनी केला.

**एफआरपी वाढली पण शेतकऱ्यांच्या हाती काय?**

यावर्षी १०.२५ टक्के रिकव्हरीसाठी ३,५०० रुपये एफआरपी जाहीर झाल्याचा मोठ्या प्रमाणावर गाजावाजा होत असला तरी, शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात किती पडतात, हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तोडणी आणि वाहतुकीचा खर्च एवढा वाढला आहे की, शेतकऱ्यांच्या हातात २००० ते २२०० रुपयांपेक्षा जास्त रक्कम पडत नाही. या वाढलेल्या एफआरपीचा शेतकऱ्याला फायदा काय? असा सवाल त्यांनी केला. याचे प्रमुख कारण बेसुमारपणे दाखवले जाणारे वाहतुकीचे खर्च असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कलाकेंद्रात आमदाराच्या भावाकडून गोळीबार

**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील चौफुला येथील एका कलाकेंद्रात गोळीबार झाल्याची चर्चा आहे. या घटनेत एका तरुणीला गोळी लागून ती जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, एका सत्ताधारी आमदाराच्या भावानेच हे कृत्य केल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. या प्रकारानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर आणि पोलीस प्रशासनावर तीव्र शब्दांत हल्लाबोल करत, प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे.

ही घटना दौंडमधील एका खाजगी कलाकेंद्रात, म्हणजेच चौफुला येथील रेणुका कलाकेंद्रात, मंगळवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडल्याची चर्चा बुधवारी सकाळी समोर आली. मिळालेल्या माहितीनुसार, कलाकेंद्रात गाणी वाजवण्यावरून दोन गटांमध्ये वाद झाला. विशेषतः लावणी वाजवायची की डीजेवरची गाणी वाजवायची यावरून हा वाद टोकाला गेला आणि त्यातूनच गोळीबार झाल्याचे बोलले जात आहे. या गोळीबारात जखमी झालेली तरुणी सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे. ती खूप घाबरलेली असून तिच्यावर आणि पोलिसांवरही दबाव टाकल्याचा संशय रोहित पवारांनी व्यक्त केला आहे. या घटनेनंतर आमदार रोहित पवार यांनी त्वरित प्रतिक्रिया दिली. त्यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, दौंडमध्ये सत्ताधारी आमदाराच्या भावाने गोळीबार केला. यात एक तरुणी जखमी झाली आहे. पोलीस यंत्रणा सत्य शोधण्याऐवजी दबावामुळे प्रकरण दाबत आहे. त्यांनी पुढे प्रश्न उपस्थित केला की, दोषींवर कारवाई होणार की त्यांना मोकाट सोडणार? हा कसला 'सत्तेचा तमाशा?' माध्यमांशी बोलताना त्यांनी हाच मुद्दा उचलून धरला की, जर पोलिसांनी माहिती दाबण्याचा प्रयत्न केला तर ते योग्य नाही, आणि उद्या जर हे आरोप खरे ठरले तर माहिती लपवणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. सत्तेतील लोकांचा मोठा दबाव असल्याचा आरोपही त्यांनी केला. या घटनेबाबत पोलिसांनी अद्याप कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. पोलिसांनी सांगितले आहे की ते सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत. मात्र, त्यांनी गोळीबार झाल्याचे अद्याप अधिकृतपणे मान्य केलेले नाही. दुसरीकडे, कलाकेंद्र चालवणाऱ्या महिलेने गोळीबार झाला नसल्याचा दावा केला आहे. त्यांनी पोलिसांना चौकशी करण्याचे आवाहन करत, जर तसे काही आढळल्यास कारवाई करावी असेही म्हटले आहे.

# भांडणे सोडवण्यास गेलेल्या तरुणाला मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यातील ताहराबाद येथे मावस भावाचे भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका २५ वर्षीय तरुणाला लाकडी दांड्याने मारहाण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दादा भाऊसाहेब बर्डे (वय २५) रा. ताहराबाद यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार २२ जुलै रोजी रात्री आठच्या सुमारास त्यांच्या घराजवळील मारुती मंदिरासमोर त्यांचा मावसभाऊ शुभम नाना पवार याला राहुल गोकुळ मोरे (रा. सोनगाव ता. राहुरी) शिवीगाळ करत होता. शुभमला सोडवण्यासाठी दादा बर्डे गेले असता, राहुल मोरे याने 'तू इथे कसा आलास' असे म्हणत त्यालाही शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर राहुलने त्याच्या हातातील लाकडी दांड्याने दादा बर्डेच्या उजव्या हातावर मारहाण केली.

या भांडणात दादा बर्डे यांचे मामा भारत बाबासाहेब पैसे हा भांडण सोडवण्यासाठी आला असता, रोहिदास मोरे (पूर्ण नाव माहित नाही, रा. टाकळीमिया, ता. राहुरी) याने एक दगड उचलून भारत पैसे यांच्या दिशेने फेकला. तो दगड त्यांच्या उजव्या पायाच्या गुडघ्याच्या खाली लागल्याने तेही जखमी झाले. या घटनेनंतर दादा बर्डे यांनी राहुल गोकुळ मोरे व रोहिदास मोरे यांच्या विरोधात राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिस करत आहेत.

# कोपरगाव : सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतीच्या आरक्षणासाठी बुधवारी तहसीलदार महेश सावंत यांच्या अध्यक्षतेखाली सोडत जाहीर करण्यात आली.

यात अनुसूचित जातीसाठी १० ग्रामपंचायती, अनुसूचित जमातीसाठी १६, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी २० तर सर्वसाधारण सरपंचपदाच्या २९ जागांचा यात समावेश आहे.

अनुसूचित जातीसाठी १० ग्रामपंचायती जाहीर झाल्या आहेत. यात सोनवाडी, पढेगाव, तळेगाव-मळे, कोळपेवाडी, आपेगाव, तर स्त्रियासाठी कोळगाव थडी, अंचलगाव, मुर्शतपुर, धोत्रे, घारी आदींचा समावेश आहे.

अनुसूचित जमातीसाठी १६ ग्रामपंचायती.यात सुरेगाव, खोपडी, वारी, घोयेगाव, बहादराबाद, रांजणगाव-देशमुख, जवळके, शहापूर तर यात अनुसूचित जमाती स्त्रिया राखीव नाटेगाव, शिंगणापूर, खिर्डी-गणेश, भोजडे, मढी बुद्रुक, बहादरपूर, मनेगाव, काकडी- मल्हारवाडी, आदींचा समावेश आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्ग यासाठी २० ग्रामपंचायतींचा समावेश झाला आहे. यात कोकमठाण, उक्कडगाव, ओगदी, चासनळी, तिळवणी, देर्डे-कोऱ्हाळे, वेस सोयेगाव, मढी खुर्द, माहेगाव-देशमुख, येसगाव तर स्त्रियांसाठी सोनारी,वडगाव, कारवाडी, बोलकी, धारणगाव, पोहेगाव बु. पोहेगाव खु, कान्हेगाव, डाउच बुद्रुक, जेऊर कुंभारी, गोधेगाव या गावांचा समावेश आहे.

सर्वसाधारण सरपंचपदाच्या २९ जागांसाठी ग्रामपंचायती निश्चित झाल्या आहेत. यात मोर्विस, धामोरी, मळेगाव थडी, कुंभारी, वेळापूर,बक्तरपुर, शहाजापूर, चांदेगव्हाण, जेऊर पाटोदा, संवत्सर, शिरसगाव -सावळगाव, सडे, डाऊच खुर्द, अंजनापुर तर स्त्रियांसाठी मायगाव देवी,सांगवी भूसार, रवंदे, मंजूर, हंडेवाडी, हिंगणी, ब्राम्हणगाव, करंजी बुद्रुक, टाकळी, कासली, लौकी,देर्डे-चांदवड,चांदेकसारे, धोंडेवाडी, दहेगाव बोलका आदींचा समावेश झाला आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण सोडत चिठ्ठी काढून नियारा क्षीरसागर या लहानग्या मुलीच्या हाताने झाली. यावेळी तहसीलदार महेश सावंत, नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, प्रफुल्लिता सातपुते, बानगर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# १ जानेवारीपासून आठवा वेतन आयोग लागू होणार

## जुनी पेन्शन योजना पूर्ववत करावी, आरोग्य-शिक्षण सुविधा वाढवाव्या; कर्मचाऱ्यांची मागणी

**नवी दिल्ली–**केंद्र सरकार १ जानेवारी २०२६ पासून आठवा वेतन आयोग लागू करणार आहे. दरम्यान, कर्मचारी प्रतिनिधींनी अलीकडेच आयोगाला अनेक महत्त्वाच्या शिफारशी सादर केल्या आहेत. या शिफारशींमध्ये जुनी पेन्शन योजना पुनर्संचयित करण्याची आणि आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित फायदे वाढवण्याची मागणी समाविष्ट आहे.

केंद्र सरकारने १६ जानेवारी २०२५ रोजी या वेतन आयोगाला मंजुरी दिली होती, जो देशभरातील लाखो सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या वेतन आणि लाभांचा आढावा घेईल.

२००४ नंतर नोकरीत रुजू झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी कर्मचारी प्रतिनिधींनी केली आहे. ही मागणी बऱ्याच काळापासून कर्मचाऱ्यांची प्रमुख चिंता आहे. याशिवाय, कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी कॅशलेस वैद्यकीय सुविधा लागू करण्याचा प्रस्ताव देखील ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे आरोग्य सेवांचा वापर सुलभ होईल आणि प्रशासकीय अडचणी कमी होतील.

**बालशिक्षण भत्त्याची मागणी**

कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी बालशिक्षण भत्ता देण्याची मागणी प्रतिनिधींनी केली आहे. यासोबतच, उच्च शिक्षणाच्या वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा म्हणून पदव्युत्तर स्तरापर्यंत वसतिगृह अनुदान वाढवण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. हे पाऊल सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च व्यवस्थापित करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

पगार, पेन्शन आणि भत्त्यांमध्ये सुधारणा केल्याने ५० लाखांहून अधिक केंद्र सरकारी कर्मचारी आणि संरक्षण कर्मचाऱ्यांसह सुमारे ६५ लाख पेन्शनधारकांना फायदा होईल.

**कर्मचाऱ्यांचा मूळ पगार ५१,००० असू शकतो**

आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर, लेव्हल-१ केंद्रीय कर्मचाऱ्यांचा मूळ पगार १८,००० रुपयांवरून ५१,००० रुपयांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. कमिशन २.८६ पर्यंत फिटमेंट फॅक्टर लागू करू शकते. पगारात ही वाढ होण्याचे हेच कारण आहे. त्याचप्रमाणे, इतर स्तरांच्या कर्मचाऱ्यांचे पगार देखील फिटमेंट फॅक्टरच्या आधारे वाढतील. सरकारला असे सुचवण्यात आले होते की कर्मचाऱ्यांचे स्तर देखील विलीन करावेत. म्हणजेच, ६ स्तर ३ मध्ये विलीन करावेत.

**पातळी विलीन करण्याचा प्रस्ताव**

कर्मचाऱ्यांच्या वतीने प्रस्ताव देणाऱ्या वकिलांनी सरकारला असे सुचवले होते की लेव्हल १ हे लेव्हल २ मध्ये, लेव्हल ३ हे लेव्हल ४ मध्ये आणि लेव्हल ५ हे लेव्हल ६ मध्ये विलीन करावे. या वकिलांनी कमी वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांचे पगार वाढवण्याचे आणि करिअर वाढीच्या संधी वाढवण्याचे सुचवले.

सध्या, लेव्हल-१ कर्मचाऱ्याचा मासिक मूळ पगार १८,००० रुपये आहे. तर लेव्हल-२ कर्मचाऱ्याला १९,९०० रुपये मिळतात. विलीनीकरणानंतर, लेव्हल-१ कर्मचाऱ्याला अधिक फायदे मिळू शकतात कारण नवीन वेतन रचना या स्तरापासून सुरू होईल.

सुधारित मूळ वेतन १८,००० ते ५१,००० रुपये असू शकते

आठव्या वेतन आयोगात २.८६ पर्यंत फिटमेंट फॅक्टर लागू होण्याची अपेक्षा आहे. यामुळे लेव्हल-१ चा सुधारित मूळ वेतन १८,००० रुपयांवरून ५१,००० रुपये होण्याची अपेक्षा आहे.

आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी अधिकृतपणे जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष फिटमेंट फॅक्टर जाहीर केला जाईल.

सध्याची वेतन रचना आणि आर्थिक मर्यादा लक्षात घेऊन आयोग या सर्व शिफारसींचे मूल्यांकन करेल. फिटमेंट फॅक्टर आणि किमान वेतन मानके यासारख्या प्रमुख मुद्द्यांवरही हा आयोग विशेष लक्ष देईल. लाखो सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना आशा आहे की आजची अर्थव्यवस्था आणि महागाई लक्षात घेऊन बदल केले जातील.

# अकोलेतील ४७ ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**अकोले (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण सोडती उपविभागीय अधिकारी विशाल यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आल्या. या सोडतीमुळे राजकीयदृष्ट्या जागृत गावांचे आरक्षण बदलल्यामुळे अनेक ठिकाणी 'कभी खुशी कभी गम' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या आरक्षण सोडतीमध्ये नवलेवाडी, औरंगपूर ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे अनुसूचित जातीसाठी राखीव तर रुंभोडी, पिंपळगाव निपाणीचे अनुसूचित जाती स्त्री राखीव असून अनुसूचित जमातीचे आरक्षण पिंपळगाव खांड, लहित बु., वीरगाव, तांभोळ, जाचकवाडी, सुगाव खु., तर अनुसूचित जमाती स्त्री राखीव आरक्षण खानापूर, देवठाण, गणोरे, मनोहरपूर, धामणगाव आवारी, वाघापूर नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण टाकळी, अंबड, लहित खु., पिंपळदरी, चास, जांभळे या गावांसाठी आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री राखीव हिवरगाव, रेडे, कळस बु., कुंभेफळ, उचखडक खु., कळंब, चैतन्यपूर तसेच सर्वसाधारण प्रवर्ग यासाठी गर्दणी, ढोकरी, सुगाव बु., कळस खु., उंचखडक बु., इंदोरी, मोग्रस, बेलापूर, बोरी आणि सर्वसाधारण स्त्री राखीव आरक्षण धुमाळवाडी, वाशेरे, बदगी, डोंगरगाव, मेहेंदुरी, मन्याळे, लिंगदेव, बहिरवाडी, परखतपूर याप्रमाणे आरक्षण सोडती काढण्यात आल्या. यावेळी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, नायब तहसीलदार किसन लोहारे, नागरिक, सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरुन

### साखर कामगारांच्या वेतनात...

मुदत ३१ मार्च २०२४ ला संपली होती. नवीन करारासाठी साखर कामगारांनी आंदोलन केल्याने राज्य सरकारने त्रिपक्षीय समिती स्थापन केली होती.

कामगारांना चाळीस टक्के वेतनवाढ द्यावी, असा प्रस्ताव कामगार संघटनांनी दिला होता. त्यावर कारखान्यांच्या वतीने चार टक्के वाढीचा प्रस्ताव देण्यात आला. पुढे कारखाना प्रतिनिधी ७ टक्क्यांवर तर कामगार संघटना १८ टक्के वेतनवाढीवर ठाम राहिल्या. त्रिपक्षीय समितीमध्ये तोडगा निघत नसल्याने याप्रश्नी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचा लवाद स्थापन करण्याचा निर्णय एकमताने घेतला. शरद पवार यांच्या सूचनेनुसार दहा टक्के वेतनवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे, असे पी. आर. पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

समितीचे सचिव रविवाज इळवे, माजी आमदार प्रकाश सोळंके, साखर संघाचे माजी अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, सदस्य दिलीपराव देशमुख, प्रकाश आवाडे, साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, कार्याध्यक्ष राऊ पाटील, कामगार महासंघाचे अध्यक्ष पी. के. मुडे, सरचिटणीस आनंदराव वायकर यांच्या उपस्थितीत वेतनवाढीचा करार करण्यात आला.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी...

या ग्रंथाचे प्रकाशन पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले.

### श्रीसाईबाबांची बदनामी करणाऱ्या...

तलवार बाबा याचा शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जावी अशी जोरदार मागणी भाविक करत आहेत.

साईबाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतीक मानले जातात आणि त्यांची बदनामी करणाऱ्या अशा कृत्यांना कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही असे साई संस्थानने स्पष्ट केले आहे. यामुळे धार्मिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना सनदशीर मार्गाने योग्य तो धडा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पावसाचा अंदाज घेऊन...

म्हणाले की, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे दिलखुलास व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी स्वतः खुलासा केला आहे. सार्वजनिक जीवनात बोलताना संयम ठेवणे आवश्यक असले, तरी त्यांच्या मनात कोणतीही दुर्भावना नसते. मात्र काही वेळा त्यांचा उत्साह अनावर होतो. या प्रकरणावर अंतिम निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार घेतील, असेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावरील आरोपांबाबत त्यांनी म्हटले की, या प्रकरणात कायदेशीर चौकशी होऊ द्यावी. चौकशीपूर्वी कोणालाही आरोपी ठरवून राजीनाम्याची मागणी करणे योग्य नाही.

विरोधकांकडे पावसाळी अधिवेशनात कोणताही ठोस अजेंडा नव्हता. हेच महायुती सरकारचे यश असल्याचे सांगत विखे पाटील म्हणाले, विरोधकांकडून केवळ आरोप करून जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, सरकारच्या निर्णयांवरून जनतेचा महायुतीवरील विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

# साखरेचे बंपर उत्पादन होण्याचे संकेत

## केंद्राकडून ऑक्टोबरपासून साखर निर्यातीला परवानगी देण्याबाबत विचारविनिमय सुरू

**नवी दिल्ली –** यंदा उसाचे बंपर पीक येण्याचे संकेत मिळाल्याने, केंद्र सरकार स्थानिक कारखान्यांना ऑक्टोबरमध्ये सुरू होणाऱ्या पुढील हंगामात साखर निर्यात करण्याची परवानगी देऊ शकते, असे ब्लूमबर्गच्या अहवालात म्हटले आहे. याबाबत 'बिझनेस स्टँडर्ड'मध्ये प्रकाशित वृत्तानुसार, जास्त लागवड क्षेत्र, पुरेसा पाऊस यामुळे प्रमुख उत्पादक प्रदेशांमध्ये पीक आशादायक दिसते. स्थानिक वापरात किरकोळ वाढीची शक्यता असल्याने, चालू पावसाळ्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला तर साखरेचा अतिरिक्त साठा होऊ शकतो, असे एका व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश असलेल्या भारताने साखर निर्यातीला परवानगी दिल्याने जागतिक किमतींवर आणखी दबाव येऊ शकतो. कारण न्यू यॉर्कमधील फ्युचर्स आधीच चार वर्षांच्या नीचांकी पातळीवर आहेत. कोरड्या हवामानामुळे आणि पीक रोगांमुळे उत्पादनात घट झाल्यानंतर केंद्र सरकारने २०२२-२३ मध्ये निर्यात कोटा प्रणाली सुरू केली. महाराष्ट्र आणि कर्नाटकसारख्या प्रमुख उत्पादक राज्यांमध्ये ऊस लागवडीचे क्षेत्र वाढल्याने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाने महासंघ लिमिटेडने २०२५-२६ मध्ये उत्पादनात १९ टक्के वाढ होण्याचा अंदाज वर्तवला आहे.

# लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्य चळवळीचा पाया मजबूत केला-पुरे




**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम लोकमान्य टिळक यांनी केले. त्यांनी गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून नागरिकांना एकत्र आणले आणि स्वातंत्र्य चळवळीचा पाया मजबूत केला, असे प्रतिपादन ग्रंथपाल स्वाती पुरे यांनी केले.

श्रीरामपूर नगरपरिषदेच्या लोकमान्य टिळक वाचनालयाच्यावतीने लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संजय प्रधान, गोरख दोंदे, रितिक अंधारे, अशोक वाघ, एम.के. दुपट्टी, वंदना पाटील, राधिका कर्डिले, सिद्धार्थ गवारे, सचिन गायकवाड, राजे जेधे, नितीन अपील, स्वप्नील माळवे, सुमन रायकर, संगीता रासकर, रुक्मिणी क्षत्रिय, कांचन चावरे, विजय झिंगारे, इंदुमती गाढे, नेहा पडांगळे, प्राची जैत, राजेंद्र बोरकर, दीपक सपकाळ, रमेश बोकफोडे, सोमनाथ साळवे, सचिन जेधे, प्रवीण ढुमणे आदी उपस्थित होते.